

गुरुपुष्यामृताचा मुहूर्त साधून सोने खरेदीसाठी आज सोन्या-चांदीच्या दुकानांमध्ये ग्राहकांची एकच गर्दी झाली होती. (छायाचित्र : अरुण गायकवाड)

# उपयोगकर्ता कर मागे न घेतल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कचरा संकलनाच्या नावाखाली शहरातील जनतेवर लावलेला उपयोगकर्ता शुल्क रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसने केली आहे. राष्ट्रवादी युवकच्या वतीने महापालिका अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांना निवेदन देण्यात आले. उपयोग कर्ता कर रद्द न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे महापालिके प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी युवक शहराध्यक्ष इम्रान शेख,राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाचे माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, प्रदीप गायकवाड, निलेश शिंदे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष ओम क्षीरसागर, विकास कांबळे,शाहीद शेख राहील मुलानी, ओमनी गायकवाड, आसिफ पटेल व युवक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रान शेख म्हणाले,

पिंपरी चिंचवड महान–गरपालिकेने कचरा संकलनाच्या नावाखाली शहरातील नागरिकां कडून स्वच्छता कर आकारला जात असताना देखील उपयोगकर्ता शुल्क या नावाने मिळकतकराच्या बिलात महिन्याला ६० रुपये प्रमाणे वर्षाला ७२० रुपये वाढ केली आहे. आणि मागील दोन वर्षाची थकबाकी म्हणून १२६० रुपये महापालिकेकडून वसूल करीत आहे. हे अन्यायकारक असून हा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा.मुळातच सदर प्रकारचा उपयोगकर्ता शुल्क महाराष्ट्रातील कोणतीही महानगरपालिका घेत नाही मग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस अशा प्रकारचा उपयोगकर्ता शुल्क घेण्याची एवढी घाई का..?

शहरातील नागरिक कर स्वरूपात लाखो रुपये कर महानगरपालिकेस भरतात, त्या मोबदल्यात महापालिकेने शहरातील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पुरवायचे असतात. याउलट त्या सुविधांना महापालिका उत्पन्नाचे साधन म्हणून पहात आहे आणि प्रशासक राजवटीच्या नाव–ाखाली मनपा विविध कर व शुल्काच्या माध्यमातून शहरातील नागरिकांची लुट करीत आहे. ही लूट म्हणजे आधुनिक जिझिया कर असून महापालिकेच्या एक अधिकार शाही निर्णयांना राष्ट्रवादी काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. हा उपयोग कर्ता कर रद्द न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे महापालिके प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

# मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अध्यक्षपदी संभाजी शिंदे

**पिंपरी :** मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत १८ पैकी १७ जागांवर विजय मिळवून राष्ट्रवादी काँगेसने वर्चस्व स्थापित केले.

त्यानंतर सभापतीपदी संभाजी अनंत शिंदे तर उपसभापतीपदी नामदेव नानाभाऊ शेलार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मावळ कार्यालयात बुधवारी (दि.२४) सहाय्यक निबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी शिवाजी घुले यांच्या उपस्थितीत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व





उप सभापतीपदाची निवडणूक घेण्यात आली.

सभापती पदासाठी एकमेव संभाजी शिंदे यांचे नामनिर्देशन पत्र तर उप सभापती पदासाठी एकमेव नामदेव शेलार यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. नामनिर्देशन पत्र छाननी व माघार झाल्यावर एकमेव उमेदवार असल्याने सभापतीपदी संभाजी शिंदे व उपसभापती पदी नामदेव शेलार यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

याप्रसंगी संचालक सुभाषराव जाधव, दिलीप ढोरे, मारुती वाळुंज, शिवाजी असवले,बंडू घोजगे, विलास मालपोटे, विलास मानकर, अमोल मोकाशी, नथु वाघमारे, विक्रम कलावडे, साहेबराव टकले, साईनाथ मांडेकर, सुप्रिया मालपोटे, अंजली जांभुळकर, शंकर वाजे, नामदेव कोंडे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीतर्फे शिरूरमधून डॉ. कोल्हे, तर मावळातून पार्थ पवार?

**पिंपरी :** देशात २०२४ मधे लोकसभेची निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या पराभवासाठी मविआच्या गोटात प्रचंड हालचाली सुरु आहेत. राज्यात लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत. त्यामुळे मविआच्या तीनही घटक पक्षांचं १६–१६–१६ जागांचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती समोर आली होती.

पण मविआच्या नेत्यांनी संबंधित बातमी खोटं असल्याचे सांगितले. पण आता सोशल मीडियावर महाविकास आघाडीच्या जागा वाटपाबद्दल एक यादी व्हायरल होत आहे. , ठरलेल्या उमेदवारांची नावेसुध्दा त्यात असून





मावळ लोकसभासाठी पुन्हा पार्थ पवार , तर शिरुरमधून डॉ. अमोल कोल्हे यांना संधी मिळणार असल्याचे यादीत दिसते.

व्हायरल बातमीत दावा करण्यात आलाय की, लोकसभेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसला सर्वाधिक १६, राष्ट्रवादी काँग्रेसला १५, ठाकरे गटाला १३ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी पक्षाला एक आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांना २ जागा देण्यात आल्याची माहिती मिळत आहे. मात्र डॉ. अमोल कोल्हे भाजपच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे दु–सरीकडे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आजच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीच्या नादी लागू नका असा सल्ला दिला असून त्यामुळे या व्हायरल बातमीत तथ्य किती याबाबत सवाल उपस्थित होत आहे.

# महापालिकेच्या इंग्रजी शाळांबाबत पालकांना माहिती देण्याची गरज

**पिंपरी :** अनेक पालकांची इच्छा असते की आपल्या मुलांना इंग्रजी शिक्षण मिळावे. यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांमध्ये भरमसाठ शुल्क भरून प्रवेश घेतात. शहरातील अनेक नागरिकांना माहित नसते की, आपल्या पिंपरी–चिंचवड शहरात पालिकेच्यादेखील इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. महापालिकेच्या इंग्रजी शाळांबाबत अधिकाधिक पालकांना अवगत करण्याची गरज आहे.

पिंपरी–चिंचवड शहरात महापालिकेच्या मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमाच्या एकूण १०५ प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा आहेत.

**या आहेत पालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या पाच शाळा**

- पिंपरी चिंचवड इंग्रजी माध्यम शाळा बोपखेल – १ ली ते ७ वी, पटसंख्या ३५६
- सावित्रीबाई फुले इंग्लिश मिडीयम स्कूल मोशी – १ ली ते ७ वी, पटसंख्या ३५२
- श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्लिश मिडीयम स्कूल पिंपरी – ज्यु. केजी ते ८ वी पटसंख्या ७२०
- छत्रपती शाहू महाराज इंग्रजी माध्यम शाळा, कासारवाडी – ज्यु. केजी ते ८ वी, पटसंख्या ८५५
- कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्लिश मिडियम स्कूल काळेवाडी – ज्यु. केजी ते ७ वी ४२४



यापैकी ५ इंग्रजी माध्यमाच्या शाळा या बोपखेल, मोशी, पिंपरी, कासारवाडी, आणि काळेवाडी येथे आहेत . या शाळांची प्रवेश प्रक्रिया लॉटरी पद्धतीने पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी व पालक यांच्या हस्ते लॉटरी काढून केली जाते. या इंग्रजी शाळांमध्ये कोणतीही फी न घेता उत्तम दर्जाचे मोफत शिक्षण दिले जाते. मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी संगणक कक्ष, प्रयोगशाळा, क्रिडा या भौतिक शिक्षणाच्या सुविधाही आहेत.

या शाळा पिंपरी चिंचवड महापालिका आणि आकांक्षा फाऊंडेशन यांच्यात झालेल्या करारानुसार शाळा चालविल्या जातात. शिक्षक हे संस्थेने नेमलेले आहेत.

या शिक्षकांचा पगार संस्था करते. शाळांसाठी भौतिक सुविधा आणि शालेय साहित्य पिंपरी चिंचवड महापालिका पुरविते.

# घरफोड्या करणाऱ्याला अटक; सोन्याचे दागिने जप्त

**पिंपरी :** बंद घरांची रेकी करून दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत चोरट्याला वाकड पोलिसांनी अटक केली आहे.

त्याच्याकडून १२ लाख २० हजार रुपये किमतीचे २० तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. त्याच्याकडून वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन आणि चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यातील एक असे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

सचिन भीमराव पाटील (वय ३२, रा. घोरपडीगाव, पुणे) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रहाटणीतील शिवराजनगर येथे १७ मे रोजी भरदिवसा एक घरफोडी झाल्याचा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी चंद्रकांत चव्हाण यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याचा तपास करत असताना वाकड पोलिसांना जगताप डेअरी येथे एक दुचाकीस्वार संशयितपणे जाताना दिसला.

पोलिसांना पाहून तो पळून जाऊ लागल्याने त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे घराचा कडीकोयंडा तोडण्यासाठी वापरलेला एक स्टीलचा रॉड आढळून आला. अधिक चौकशीत संशयित व्यक्ती सचिन पाटील हा शिवराजनगर येथील घरफोडीतील आरोपी असल्याचे उघड झाले. सचिन पाटील याने वाकड आणि चतुश्रृंगी भागात तीन घरफोड्या केल्या असल्याचे तपासात उघडकीस आले. पोलिसांनी त्याच्याकडून १२ लाख २० हजार रुपये किमतीचे २० तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहे.

# पोटाच्या भुकेइतकीच सांस्कृतिक भूक महत्त्वाची

**गजानन पातुरकर यांचे प्रतिपादन**



**पिंपरी :** पोटाच्या भुकेइतकीच सांस्कृतिक भूक महत्त्वाची असते! असे प्रतिपादन ज्येष्ठ एकपात्री हास्यकलाकार गजानन पातुरकर यांनी केले.

मधुश्री कला आविष्कार आणि प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मधुश्री व्याख्यानमालेत 'हास्यविन–ोदातून समाजप्रबोधन' या विषयावरील द्वितीय पुष्प गुंफताना गजानन पातुरकर बोलत होते. माजी नगरसेविका शर्मिला बाबर अध्यक्षस्थानी होत्या; तसेच प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्याध्यक्ष भगवान महाजन, मधुश्री कला आविष्कारच्या अध्यक्ष माधुरी ओक, कार्याध्यक्ष सलीम शिकलगार, सचिव राजेंद्र बाबर यांची व्यासपीठावर प्रमुख उप–स्थिती होती

पातुरकर पुढे म्हणाले की, दिवसेंदिवस सुसंवाद, वाचन या गोष्टी झपाट्याने कमी होऊ लागल्या आहेत. आताच्या यांत्रिक जीवनात सुखकर जगण्यासाठी सकारात्मकता आचरणात आणण्याची गरज आहे. पाहाल तशी दुनिया आहे; त्यामुळे जगाकडे हसून पाहिले तर जगदेखील तुमच्या हास्यात सहभागी होईल.

माणूस हा एकमेव हसणारा प्राणी असल्याने संधी मिळेल तेव्हा मनमुरादपणे हसा. हसल्याने रक्ताभिसरण चांगले होते. पुस्तके वाचताना माणसेही वाचायला शिका!

शेरोशायरी, कविता, किस्से, विनोद यांची पखरण करीत पातुरकर यांनी बदललेल्या जीवनशैलीतील स्थित्यंतरे मार्मिकपणे मांडून श्रोत्यांना खळखळून हसवले. हसण्याचे प्रकार, सुप्रसिद्ध सिनेकलावंतांचे आवाज आणि येरे येरे पावसा... ही बालकविता वेगवेगळ्या कलाकारांच्या आव–ाजात सादर करीत त्यांनी रसिकांकडून उत्स्फूर्त हशा अन् टाळ्या वसूल केल्या. मोबाइलचे दुष्परिणाम सांगून 'आई' या कवितेने आपल्या व्याख्यानाचा समारोप करताना त्यांनी श्रोत्यांना अंतर्मुख केले. राजेंद्र बाबर यांनी प्रास्ताविक , राज अहेरराव यांनी स्वागत केले. अश्विनी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. उज्ज्वला केळकर यांनी आभार मानले.

## हातोडीने घाव घालून तरुणास केले जखमी

**पिंपरी :** पूर्ववैमनस्यून एका २८ वर्षीय तरुणाच्या डोक्यात हातोडीने घाव घालत गंभीर जखमी केले आहे. ही घटना बुधवारी (दि. २४) सकाळी हिंजवडी येथील एका साईटवर घडली.

याप्रकरणी सुरेंदर नागेंदर पांडे (वय ३२, रा. काळेवाडी) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार अनिल कुमार निशाद (वय २७, रा. हिंजवडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा कामगार महम्मद युसुफ पठाण (वय २८) व आरोपी हे अटलांटा साईटवर काम करतात.

आरोपी पठाण यांच्यात झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीने पठाण याच्या डोक्यात लोखंडी हातोडा मारत त्याला गंभीर जखमी केले. हिंजवडी पोलिस तपास करत आहेत.

# दर पाच ते दहा मिनिटाला बस हाच बीआरटीएसला पर्याय

**पिंपरी :** स्वस्त,सुंदर, वातानुकूलित व दर पाच ते दहा मिनिटात बस हाच बी आर टी एस ला पर्याय असल्याचे सामाजिक कार्यकर्ते राजेश अग्रवाल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

आपल्याकडे बी. आर.टी.एस. परदेशी संकल्पना कॉपी पेस्ट केली गेली आहे. पण आपल्या देशाची परिस्थिती ही पाश्चिमात्य देशाच्या पेक्षा वेगळी आहे. बी.आर.टी.एस संपूर्ण सिस्टीम अमलात आणण्यासाठी एकट्या पुणे आणि पिंपरी–चिंचवड शेकडो कोटी रुपये खर्च झाले . तरीही अपेक्षित यश आले नाही, उलट वाहतूक कोंडी वाढली. बी.आर.टी.एस. चे प्रमुख उद्देश होते जलद सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे, लोकांनी वैयक्तीक वाहने न वा–परता जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतूकीचा वापर करावा. आज गरीब व काही प्रमाणात मध्यम वर्ग सार्वजनिक बसचा वापर करतात. बस चा जास्तीत जास्त वापर वाढवायचा असेल तर सर्व बसेस स्वच्छ, वातानुकूलित व त्याच्या फेऱ्या वाढल्या पाहिजे. पुणे व पिंपरी–चिंचवड मध्ये कोणत्या ही भागात जाण्यासाठी जर स्वच्छ, वातानुकूलित बस दर पाच ते दहा मिनिटात उपलब्ध झाल्या तर शहरातील उच्च वर्ग सुद्धा सार्वजनिक बस वापरू लागेल.

वैयक्तीक वापराच्या कार वर त्यांच्या लांबी– रुंदी प्रमाणे सार्वजनिक वाहतूक कर लावून त्या पैश्याचा वापर करून बस चे तिकीट एकदमच नाममात्र करावे. बसचे तिकीट कमी झाल्यास मध्यम वर्गीय व्यक्ती जास्त प्रमाणात बसचा वापर करू लागतील.

त्यामुळे शहराच्या रस्त्यांवर बसेस जास्त व दोन चाकी, चार चाकी कमी दिसतील, वाहतुकीचा वेग आपोआपच वाढेल. लोकांना बस ची सवय लागेल. बी. आर. टी.एस वर इतका प्रचंड खर्च करून जे साध्य झाले नाही ते ह्या पद्धतीने साध्य करता येऊ शकते.असे अग्रवाल यांनी म्हटले आहे.

# रेकॉर्डवरील गुन्हेगारासह दोघांना अटक

**पिंपरी :** खंडणी विरोधी पथकाने चिंचवड परिसरातून रेकॉर्डवरील गुन्हेगारासह दोघांना अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्टल आणि तीन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. ही कारवाई वाल्हेकरवाडी रोड, चिंचवडे नगर येथे करण्यात आली.

सुनील बाळासाहेब खेंगरे (वय ३८, रा. चिंचवडेनगर, चिंचवड), अभिजीत अशोक घेवारे (वय ३५, रा. काळेवाडी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड शहर परिसरात गोळीबार करून खून करण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने याबाबत कारवाई करण्याचे गुन्हे शाखांना आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी आणि अंमलदार चिंचवड परिसरात गस्त घालत असताना पोलीस अंमलदार आशिष बोटके आणि प्रदीप गोडांबे यांना माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार सुनील केंद्रे आणि त्याच्या साथीद–ाराकडे पिस्टल आहे. त्यानुसार पोलिसांनी वाल्हेकरवाडी रोड, चिंचवडेनगर येथून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख २० हजार ६०० रुपये किमतीचे तीन देशी बनावटीचे पिस्टल आणि तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. आर–ोपी सुनील केंद्रे याच्यावर २०११ सली भोसरी पोलीस ठाण्यात दुहेरी खुनाचा गुन्हा दाखल आहे.